प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. २६/०५/२०१८

## दत्तवाडी पोलीसांनी खुनातील फरारी आरोपीला केले जेरबंद

दिं. २५/०५/२०१८ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो शि विकास कदम व पो शि सागर सुतकर यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "दत्तवाडी पो.स्टे. पुणे मधील गुन्हा. रजि. नं. ०५/२०१८ भादवि कलम ३०२,३०७,३२३,५०६ मधील मागील ५ महिण्यांपासून फरारी आरोपी नामे सागर विलास जाधव हा राजाराम पुलाच्या ब्रीज खाली त्याच्या मित्रासोबत बसला आहे. त्यावेळी सदर ठिकाणी पोलीस उप-निरिक्षक डफळ व पोलीस उप-निरिक्षक संकपाळ, पो.ना.४४९१ गाढवे, पो.शि ८७१० सुतकर , पो.शि ८३६१ कदम , पो.शि.१००९७ कळसकर, पो. शि. खैरे असे मिळुन सदर ठिकाणी गेले असता, त्यावेळी तो नदी पात्रात त्याच्या मित्रासोबत गप्पा मारत बसला होता. त्यावेळी पोलीसांना पाहताच तो पळुन जावु लागला. त्यावेळी पोलीसांनी त्यास स्टाफच्या मदतीने जागीच पकडुन ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणले. त्यावेळी त्यास पोलीस स्टेशन मध्ये त्याच्यावर दाखल असलेल्या गुन्हयाबाबत माहिती देवुन दि.२५/०५/२०१८ रोजी १९/३० वा. अटक करण्यात आली आहे. आरोपीला आज दि.२६/०५/२०१८ रोजी मा. कोर्टात हजर केले असता, मा. कोर्टाने त्यास दि. ३१/०५/२०१८ रोजीपर्यत ६ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. सदरची कारवाई ही मा. डॉ. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पो. ना. महेश गाढवे, पो शि विकास कदम, पो. शि. सागर सुतकर, पो शि रोहन खैरे, व पो. शि. राहुल ओलेकर, पो शि शरद राऊत, पो शि शिवाजी क्षीरसागर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पोलीस उपनिरिक्षक कुलदिप संकपाळ हे स्वतः करीत आहेत.